सुराज्य सोलापूर

रविवार, दि. ०४ सप्टेंबर २०२२

वाढदिवस विशेष



सोलापूरच्या मातीचा गंध मस्तकी लावून देशाच्या राजकारणात एक सुपुत्र उतरला. नव्हती याच्याकडे कोणतीच घराणेशाहीची कवचकुंडले. नव्हते पाठबळ पैशाचे. गणित जुळत नव्हते समाजाचे. पण जिद्द होती आकाश कवेत घेण्याची. ध्यास होता जनसेवेचा. म्हणूनच पेलली त्यांनी सर्व आव्हाने. तुडवली सारी संकटे. मोडली सारी पारंपारिक बंधने. अन् मिळवले अढळ स्थान जनतेत. मिळवला मान पक्षात. मिळवला सन्मान जगात. अशा भारताचे माजी गृहमंत्री, सोलापूर सिद्धरामेश्वरनगरीचे सुपुत्र, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, काँग्रेस पक्षाचे माजी सरचिटणीस आणि आंध्र प्रदेशचे माजी राज्यपाल म्हणून आपली सामाजिक व राजकीय कारकीर्द पूर्ण करणारे साहित्यप्रेमी नेते सुशीलकुमार शिंदे यांचा आज ८२ वा वाढदिवस. सर्व पक्षातील नेत्यांशी मैत्रीपूर्ण संबंध जपणारे राजकारणी, प्रत्येक वर्गासाठी कार्य केलेले समाजकारणी, राज्याचा अर्थसंकल्प विक्रमीवेळा सादर करणारे अर्थकारणी, कला, नाट्य, साहित्य क्षेत्रावर प्रेम करणारे साहित्यप्रेमी, भारतातच नाही तर जगात सोलापूरचे नाव पोहचवणाऱ्या या सोलापूरप्रेमी व्यक्तिमत्त्वाचा कोणालाही हेवा वाटेल अशी वाटचाल आहे. कोणत्याही राजकीय चष्म्यातून न पाहता तटस्थपणे पाहिल्यास या 'बाप' माणसाला कडक 'सॅल्यूट' करावाच वाटेल. म्हणूनच आता त्यांचे कार्य सांगायची गरज नाही तर त्यांनी केलेल्या कार्याबद्दल ऋण व्यक्त करण्याची गरज आहे. त्यासाठीच थॅंक्स साहेब या विशेष पुरवणीचा हा खटाटोप.....

# Thanks साहेब

## या कन्यादानाला तोड नाही



पान ३

## दगडू ते रॉकी




पान ३



# समाजसेवेचं सहस्त्रचंद्रदर्शन...

सोलापूरचे सुपुत्र तथा काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांचा आज वाढदिवस. एक वर्ष उलटल्यानंतर प्रत्येक माणसाच्या आयुष्यात वाढदिन येत असतो. मात्र, सुशीलकुमार यांच्या यंदाच्या वाढदिनाचा विलक्षण योगायोग आहे. याचा तमाम कार्यकर्त्यांना तसेच सोलापूरकरांना विशेष आनंद असणार आहे. ते ८१ व्या वर्षात पदार्पण करत आहेत. माणसाच्या जीवनात आयुष्याचे टप्पे ठरलेले असतात. जसं की,सोळावं वरीष धोक्याचं. पंचवीशी म्हटल्यानंतर तारूण्य आणि साठी ओलांडल्यानंतर आयुष्याची संध्याकाळ.पंच्याहत्तरी लागताच अमृत महोत्सव. साठीनंतर दीर्घायुष्याचे आशीर्वाद व शुभेच्छा सुरू व्हायला लागतात. त्यानंतरचे ज्यांना ज्यांना आयुष्य मिळते, ते समाजाच्या दृष्टीने भाग्यवान ठरतात. विशेष करून ऐंशीनंतर आयुष्याचा सहस्रचंद्रदर्शन सोहळा होत असतो. सहस्त्रचंद्रर्शना हा एक धार्मिक तसेच सामाजिक समारंभ आहे. एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात एक हजार पौर्णिमा येऊन गेल्या की, हा समारंभ केला जातो. या सहस्रचंद्रदर्शन समारंभाच्या दिवशी नातेवाईकांच्या आणि मित्रमंडळींच्या उपस्थितीत एक होमहवनादी धार्मिक विधी केला जातो. त्याच दिवशी त्या जेष्ठ व्यक्तीची बहुधा तुला करण्यात येते आणि ज्या वस्तूने तुला केली गेली ती वस्तू दान केली जाते. आयुष्याला असलेली ही धार्मिक जोड सोडून द्या. एकमात्र, सुशीलकुमार यांच्या आयुष्याकडे ङ्गसमाजसेवेचा सहस्त्रचंद्रदर्शनङ्ग सोहळा म्हणून पहावे लागेल. उभ्या देशातील आणि महाराष्ट्रातील त्यांचे सामाजिक व राजकीय कार्य ललामभूत आहेच शिवाय सोलापूरला प्रतिष्ठा व सामर्थ्य देणारे आहे,यात शंकाच नाही. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी राजकीय क्षेत्रात पाऊल टाकल्यानंतर राज्यातील १९ आणि केंद्रीयस्तरावरील २२ अशा ४१ वर्षांच्या राजकीय प्रवासात त्यांनी मागे वळून कधीच पाहिले नाही. त्यांची राजकीय कमान सतत चढती ठरली. प्रत्येक विषयाचा बारिक-सारिक अभ्यास, कर्तव्यनिष्ठ सेवा आणि सर्वांशी मैत्री ही मूल्ये त्यांनी कसोशिने जपली. त्यामुळेच त्यांचा राजकीय प्रवास सुकर झाला. १९७३ ला करमाळ्यातून पहिल्यांदा आमदारकीची इलेक्शन जिंकल्यानंतर अनेक वर्षांच्या मंत्रीपदाच्या पायघड्या त्यांच्यापर्यंत चालून आल्या. राज्यात नऊवेळा त्यांनी अर्थसंकल्प मांडला. हे सर्वांना ठाऊक आहे.



१९९२ ला त्यांना केंद्रीय राजकारणात श्रेष्ठींनी दिल्लीला पाचारण केले. राज्यसभेवर त्यांची नियुक्ती झाली. २००४मध्ये राज्यात काँग्रेस अंतर्गत बऱ्याच घडामोडी झाल्या. तेव्हा श्रीमती सोनिया गांधी यांनी त्यांना पुन्हा राज्यात पाठवून मुख्यमंत्री केले. वास्तविक पाहाता राज्यात असतानाच ते मुख्यमंत्री व्हायला हवे होते परंतु पक्षांतर्गत शहकाटशह त्यांना पचवावा लागला. ङ्गभगवान की घर में देर है,लेकिन अंधेर नाहीङ्ग,असे एक हिंदीत सुभाषित आहे.सुशीलकुमार यांनी अत्यंत दिलदारपणे त्याचा स्वीकार करून राज्याच्या नेतृत्वाची धुरा वाहिली.२००४ मध्ये विधानसभेच्या निवडणुका त्यांच्याच नेतृत्वाखाली झाल्या आणि काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळवून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. हे यश पाहाता ते पुन्हा मुख्यमंत्री व्हायलाच हवे होते.परंतु पक्षांतर्गत स्पर्धा त्यांना आड आली.पक्षातील पाय ओढाओढीचा हा प्रकारही त्यांनी सहन केला.या निवडणुकीच्या काळात विरोधकांकडून त्यांच्यावर प्रचंड टीका झाली. शिंदे यांनी सोलापूरसाठी काय केले? जे केले ते किती दिवस सांगत बसणार? असे प्रश्न विरोधकांनी विचारले होते. त्या प्रश्नांना उत्तरे देण्याच्या भानगडीत ते कधीच पडले नाहीत. आपले कार्य सोलापूरशी बोलत राहील,असे ते स्वतःच्या मनाशीस बोलून शांत राहिले. विरोधकांची टीका हा राजकारणाचा भाग झाला.पण एक तटस्थ म्हणून त्यांनी सोलापूरसाठी काय केले हे मला आवर्जून सांगावेसे वाटते. लोकांना मूलभूत सुविधा देणे हे प्रत्येक लोकप्रतिनधीचे कर्तव्यच असते पण आपल्या शहराला नेमके काय हवे? पुढे काय लागणार आहे? याचा विचार करून नव्या योजना आणणे,नवे प्रकल्प आणणे यात लोकप्रतिनिधींची दूरदृष्टी असावी लागते. हे लाँग व्हीजन सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापूरसाठी दाखवून दिले आहे.








केंद्रीय राजकारणात जातेवेळी त्यांच्याकडे राज्य मंत्रीमंडळात नगरविकास खात्याची जबाबदारी होती. भविष्यात सोलापूरची वाढत्या लोकसंख्येचा विचार करून त्यांनी सोलापूर ते उजनी ही पाणी पुरवठ्याची नवी स्कीम मंजूर करून दिली. ती १९९७ ला कार्यान्वित झाली. या योजनेसाठी उजनी धरणातून जिथे पाण्याचा उपसा केला जातो,त्याला यशवंत जलाशय असे नाव दिले आहे. कारण उजनी धरण निर्मितीसाठी महाराष्ट्राचे शिल्पकार यशंवतराव चव्हाण यांची कृपा लाभली म्हणून हे नामकरण केले गेले. ही योजना सुरू झाल्यापासून सोलापूरकरांना तीन दिवसाआड होईना मुबलक पाणी मिळत आहे. शेजारच्या लातूर-उस्मानाबादसारखे हाल आपले नाहीत,ही बाबही ध्यानात घ्यावी लागेल. यानिमित्ताने पाणी टंचाईचा एक कटु अनुभव सांगता येईल. सोलापूरला त्याकाळी टाकळी-सोरेगाव आणि हिप्परगा तलाव ह्या दोनच पाणीपुरवठ्याच्या योजना होत्या. त्या दोनही योजना चालू राहिल्या तरच पाणी पुरवठा सुरळीत असायचा. एक जरी बंद राहिली तर सोलापूरकरांची घशाला कोरड पडायची. टाकळीजवळ भीमा नदीतील पाणी संपू लागल्याचे दिसताच पंधरा दिवस अगोदर उजनीमधून पाणी सोडण्याचे सरकारचे बंधन होते. एक अनुभव सांगता येईल. १९९६ ला लोकसभेच्या निवडणुका होत्या. पुढारी मंडळी प्रचारात मग्न होती. त्याच काळात उजनीमधून सोडलेले पाणी वेळेत टाकळीला न आल्याने टाकळी-सोरेगाव ही स्कीम बंद पडली आणि सोलापुरात हाहाकार माजला. आठ दिवस सोलापूरकरांची पाण्यासाठी पायपीट सुरू होती. जिकडे तिकडे दुचाकीवर घागरी घेऊन सोलापूरकर पाण्यासाठी फिरत होते.एकट्या हिप्परगा तलावावर साऱ्या शहराला पाणी देणे अशक्य होते. टाकळीला पाणी का आले नाही? याचा पालिकेकडून युद्धप-तळीवर शोध सुरू झाला तेव्हा मंगळवेढा तालुक्यातील बठाणच्या बंधाऱ्यात हे पाणी अडवले गेले होते. त्यामुळे हे पाणी टाकळीपर्यंत येऊ शकले नाही. पालिकेतील सत्ताधाऱ्यांची झोप उडली. सोलापूर-उजनी ही रखडलेली स्कीम तातडीने सुरू करण्याच्या हालचाली झाल्या.१९९७ ला उजनीमधून पाणी शहरात पोहचले. ही स्कीम नसती तर आज सोलापूरकरांचे काय हाल झाले असते. रेल्वेने कुठून तरी पाणी आणण्याचा बाका प्रसंग दरवर्षी ओढवला असता. आज २०३२पर्यंतच्या वाढत्या लोकसंख्येला पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन फतोटेवाडीतील एनटीपीसीकडून उजनीपर्यंत दुहेरी जलवाहिनी टाकण्याचे काम प्रस्तावित आहे. एखादा उद्योग आणण्यापेक्षा एखादी जीवनाची स्कीम आणणे हे किती फायद्याचे असते हे याठिकाणी सांगावे लागेल. नेत्याकडे अशी दूरदृष्टी असावी लागते. सुशीलकुमार यांच्या कामातून त्याचा प्रत्यय आला आहे. नव्या पिढीला वास्तव कळावे म्हणून हा विषय आवर्जून मांडला. सोलापुरात आठ वर्षे झाली बीजेपीचा खासदार आहे. आमदार आहेत. गतवेळेस दोन मंत्री होते. किती स्कीम आणल्या? किती उद्योग आणले? असा प्रश्न कुणी विचारला तर त्यात गैर काय?




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥

**शब्दांकन : पुरुषोत्तम कुलकर्णी**

## औद्योगिक सौभाग्य...

केंद्रात उर्जामंत्री असताना सुशीलकुमार यांनी एनटीपीसीचा एक मोठा उद्योग सोलापूरला दिला. फताटेवाडीजवळ एक छानसे छोटे शहरच तिथे उभे राहिले आहे. हा उद्योग कार्यान्वित झाला असून तिथली वीज आज राज्याला व देशाला दिली जातेय. या उद्योगातून स्थानिकांना शेत जमीनीचा प्रचंड मोबदला मिळाला तसेच रोजगारही मिळाला. हा उद्योग येणार म्हटल्यानंतर सोलापूरचे तापमान वाढणार? सोलापूरकरांची होरपळ होणार? असा अपप्रचार विरोधकांकडून केला गेला. त्याला न डगमगता विरोधकांच्या नाकावर टिच्चून त्यांनी हा प्रकल्प मार्गी लावला. या एनटीपीसीमधून सुशीलकुमार यांनी सोलापूरला अजून एक फायदा करून दिला. एनटीपीसी ते म्हणजे एनटीपीसी व महापालिका यांच्याकडून फताटेवाडी ते उजनीपर्यंत समांतर जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. पण गेल्या चार वर्षांपासून त्याचे काम प्रलंबित आहे. पालिकेत टक्केवारीची ङ्गलोणीङ्ग पालिकेतील सत्ताधीशांना व अधिकाऱ्यांना स्वस्थ बसू देत नाहीय.आज २०० कोटींची ही योजना सहाशे कोटींपर्यंत गेली आहे. अजून विलंब झाला तर बजेट अजून वाढत जाणार आहे. निविदा काढण्यास का उशिर होतोय,हे विचारण्याची हिम्मत सोलापूरकरांनी रस्त्यावर येऊन दाखवली पाहिजे. उठाव होत नसल्यानेच पालिकेचे फावत चालले आहे.विकास कामे व योजनांमध्येही खुनशी राजकारण घुसले आहे.



## विद्यार्थ्यांची मोठी सोय...

मुख्यमंत्री असताना सुशीलकुमार यांनी सोलापूरला स्वतंत्र विद्यापीठ मंजूर करून दिले. एका सोलापूरसाठी विद्यापीठ कशासाठी? असा सूर त्यावेळी आळवला गेला. पण सोलापूरचा विस्तार पाहाता आणि कोल्हापूरचे अंतर पाहाता सोलापुरातच विद्यापीठ व्हावे,अशी जाणकारांची मागणी होती.त्याची दखल घेऊन शिंदे यांनी विद्यापीठ उभारणीत मोठे योगदान दिल्याचे सत्य कुणालाच नाकारता येणार नाही. आज विद्यापीठाकडून नवे नवे अभ्यासक्रम येतायेत.गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांची शैक्षणिक सोय झाली आहे. त्याचे समाधान विद्यार्थी आणि पालक यांच्या चेहऱ्यावर दिसून येते.

## धाडसी मुख्यमंत्री

मुख्यमंत्री धाडसी कसा असावा याचे एक आदर्श उदाहरण सुशीलकुमार यांच्या रूपातून सांगता येईल. २००४ मध्ये सोलापूरसह जिल्ह्यात अवर्षण स्थिती होती. उजनी धरणातील पाण्याने तळ गाठला होता. अशातच सोलापूरच्या पाणी टंचाईचा प्रश्न गंभीर बनला होता. त्याचा विचार करून पुण्यातील पवना धरणातून उजनीत पाणी सोडण्याच्या निर्णयावर मुख्यमंत्री म्हणून सुशीलकुमार यांनी सही ठोकली. तेव्हा पुण्यातील पुढाऱ्यांचा पारा चढला.पवनामधून पाणी घेतल्यास रक्ताचे पाट वाहातील,अशी भाषा पुण्यातील पुढाऱ्यांमधून त्यावेळी केली गेली. तरीही सुशीलकुमार डगमगले नाहीत. पवना धरणातून चार टीएमसी पाणी सोडण्यास त्यांनी भाग पाडले. धमक्यांना त्यांनी भीक घातली नाही.

## रंजक कहाणी...

सुशीलकुमार हे पुरोगामी विचाराचे. पण हा विचार मांडत असताना त्यांनी अन्य धर्माचा, देवदेवतांचा अनादर कधीही केला नाही. उलट सर्वधर्मिय लोकांशी त्यांचा जिव्हाळ्याचा संबंध होता. साठ-सत्तरच्या दशकात वर्णभेद आणि जातीय भेद होता. त्यावर मात करून सुशीलकुमार यांनी प्रेमविवाह उरकून घेतला. बार्शीच्या वैद्य कुटुंबातील उज्ज्वला वैद्य यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांनी धर्मानुसार तिथी वगैरे पाहिली नाही.राष्ट्र दिनाचा मुहूर्त साधला. १ मे १९७०ला हा विवाह केवळ ५२ रूपयांमध्ये झाल्याची नोंद आढळते. या आंतरजातीय विवाहाला पहिल्यांदा विरोध झाला पण पुढे काही दिवसांनी विरोध करणाऱ्यांनीच त्यांच्या डोक्यावर अक्षता टाकल्या. एका कर्तृत्ववान पुरूषाच्या मागे गृहिणी उभी असते,असे म्हणतात,त्याप्रमाणे उज्ज्वलाताईंनी सुशीलकुमार यांना समर्थ साथ दिली.

## असा नेता आहे?

सत्तेच्या माध्यमातून सुशीलकुमार यांनी सोलापूरला खुप काही दिले आहे. त्याची मोजदाद करताच येणार नाही. २०१४मध्ये लोकसभा निवडणूक लागण्यापूर्वी त्यांनी सोलापूर शहरातील ड्रेनेज लाईनसाठी, नव्या सिटीबससाठी कोटींचा निधी मिळवून दिला. रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून त्यांनी सोलापूरचा चेहरामोहरा बदलून टाकला. सत्ता ही प्रत्येक राजकीय पक्षांची असतेच. पण अशी सत्ता स्वतः उबवून ती लोकांच्या सत्कारणी लावली पाहिजे, असा लोकशाहीचा संकेत सांगितला जातो. सुशीलकुमार यांनी हा आदर्श जोपासला आहे. शिंदे यांच्यासारखा नेता आज सोलापुरात आहे काय? समाजसेवेच्या सहस्त्रचंद्रदर्शनाच्या निमित्ताने त्यांचा तुलाभार करायचे ठरवले तर त्यात कितीही नाणी,सोने व धान्य टाका.त्याची उतराई होऊच शकणार नाही.कारण सुशीलकुमार त्यांच्या समाजसेवेची शिदोरी प्रचंड वजनदार आहे. इतकी मोठी शिदोरी त्यांनी सोलापूरला दिली आहे.इतके काम करूनही त्यांच्या वाट्याला पराभव यावा,हा सृष्टीचा दोष म्हणावा लागेल.



## चढती कमान

सुशीलकुमार यांची जी राजकीय कमान आहे,त्याची उंची मोजताच येणार नाही.कारण त्यांची उंचीच इतकी मोठी आहे. पक्ष जी जबाबदारी देईल,ती त्यांनी आनंदाने स्वीकारली. १६ जानेवारी २००३ ते १ नोव्हेंबर, २००४ या काळात ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. २००४ ते २००६ या कालखंडात ते आंध्र प्रदेशाच्या राज्यपालपदी होते. ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात असून मनमोहनसिंग मंत्रिमंडळात भारताचे गृहमंत्री होते. सलग साडेसहा वर्षे केंद्रीय ऊर्जामंत्री पदावर राहणारे व लोकसभेच्या नेतेपदी निवड होणारे ते पहिले मराठी नेते ठरले.श्रीमती सोनिया गांधी यांनी दिल्लीतून महाराष्ट्रात पाठवल्यानंतर सोलापूरच्या राजकारणात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले.त्यामुळे श्रेष्ठींनी त्यांना पुन्हा दिल्लीला बोलावून घेतले. सुशीलकुमार यांनी पुन्हा सोलापूरची खासदारकी प्राप्त केली तेव्हा गृहमंत्री झाले.हे पद म्हणजे पंतप्रधानपदाच्या जवळचे मानले जाते.तेव्हा सोलापूरकरांच्या अशा पल्लवित झाल्या होत्या. त्यांना पंतप्रधान म्हणून पाहाण्याची सोलापूरकरांची इच्छा होती. असो. त्याबाबत सुशीलकुमार यांनी कधीही खळखळ केली नाही वा आपली सल बोलून दाखवली नाही. ते नेहमी म्हणत असत. सत्ता ही कुणाची मक्तेदारी नाही.खरा राजा मतदार आहे.




## अजात शत्रू

इतक्या वर्षांचे राजकारण करताना सुशीलकुमार यांनी सर्वच राजकीय पक्षांशी मैत्री जुळवली होती. कुणावरही अवास्तव टीका करायची नाही.हा त्यांचा स्वभाव धर्म. पण वेळ आलीच की,ते फटके लगावण्यासही हयगय करत नसत. केंद्रात अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार असताना युनोमध्ये भारताची आंतरराष्ट्रीय बाजू मांडायची होती. तेव्हा अटलजींनी त्यासाठी सुशीलकुमार यांची निवड केली होती. हा विश्वास त्यांनी सार्थ करून दाखवला. युनोत भारताची सहिष्णुता सुशीलकुमार यांनी परखडपणे मांडून जगाचे लक्ष वेधून घेतले होते.याच काळात उपराष्टपतीपदाच्या निवडणुकीत भाजपने स्व.भैरवसिंह शेखावत यांना मैदानात उतरवले होते तर काँग्रेसकडून सुशीलकुमार यांना उमेदवारी दिली गेली.शेखावत विजयी झाल्यानंतर अगदी हसतमुखाने व दिलदारपणे सुशीलकुमार यांनी शेखावत यांना अलिंगन देऊन शुभेच्छा दिल्याचे या देशाने त्यावेळी पाहिले आहे.सर्वच राज्यांमधील नेत्यांशी त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. इतकेच नाही तर देशाच्या अनेक भागात सुशीलकुमार यांनी गरीब तरूणांना त्यांच्या आयुष्याची भाकरी मिळवून दिली आहे.

## खडतर जीवनावर मात

बालपण ते राजकारणपूर्व त्यांचा जीवन प्रवास खडतर होता. वडिलांच्या निधनानंतर घरची परिस्थिती खालावत गेली. आठवी उत्तीर्ण झाल्यानंतर सोलापूरच्या न्यायालयात शिरस्तेदाराची (शिपाई म्हणून) नोकरी मिळाली. वकिलांना पुकारायचे ते काम होते. एकीकडे शिरस्तेदारांची नोकरी आणि दुसरीकडे शाळा सुरू होती. हातात दोन पैसे येत असल्याचे समाधान होते. नोकरी करीत असताना त्यावेळी शाळेत बसविलेल्या नाटकातही काम केले. न्यायालयात दहा वर्षे नोकरी केल्यानंतर तेथे बढती मिळून क्लार्कची जागा मिळाली. १९६५ मध्ये बीएची पदवी घेतल्यानंतर नोकरीचा राजीनामा दिला आणि कायद्याच्या अभ्यासासाठी पुणे गाठले. पुण्यातील लॉ कॉलेजमध्ये शिक्षण घेत असताना तेथे विद्यार्थी चळवळीतही सहभाग घेतला. त्या वेळी शरद पवारांशी भेट झाली. काकासाहेब गाडगीळांनीही त्यांना मदतीचा हात दिला. कायद्याचे शिक्षण आणि विद्यार्थी चळवळ सुरू असतानाच त्यावेळी वर्तमानपत्रात पोलीस उपनिरीक्षकपदासाठी जाहिरात प्रसिद्ध झाली होती. त्यांना उपनिरीक्षक म्हणून नोकरी मिळाली, तिच्यातूनच मुंबईत सीआयडी विभागात नवी नोकरी सुरू झाली. ही नोकरी करीत असतानाच सुशीलकुमारांनी कायद्याचे शिक्षण पूर्ण केले.



## राजकीय योगायोग...

पोलीस निरीक्षक असल्याने सुशीलकुमार यांचा राज्यकर्त्यांशी संबंध यायचा. पुढे मुंबईत एके दिवशी शरद पवारांची दुसऱ्यांदा भेट झाली. परिचय वाढत गेला. घट्ट मैत्री झाली. राजकारणात प्रवेश करण्याविषयी विचारणा झाली. प्रदेश काँग्रेस कमिटीत कामास सुरुवात करण्याची तयारी दाखविली. पुन्हा नोकरीचा राजीनामा दिला. पवारांनी पुढे विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी तयार केले. ६ नोव्हेंबर १९७१ला त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला आणि ९ नोव्हेंबरपासून सोशॅलिस्ट फोरमचे निमंत्रक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. १९७२मध्ये सोलापूर (करमाळा तालुका) मतदार संघातून तिकीट मिळणार होते. मात्र, ते ऐनवेळी मिळाले नाही. पुढे या मतदारसंघाचे आमदार ताराप्पा सोनवणे यांचे आकस्मित निधन झाले. पोटनिवडणूक लागली. शिंदे यांना काँग्रेसने उमेदवारी दिली. विजय संपादन करून ते २३ एप्रिल १९७३ रोजी प्रथमच आमदार झाले. चौकट-होटगी रस्त्यावरील विमानतळ,बोरामणीचे प्रस्तावित विमानतळ,डाळींब संधोधन केंद्र,लिंबीचिंचोळी येथील पॉवरग्रीड,टाकळी येथे बीएसएफचे प्रशिक्षण केंद्र अशी अनेक विकास कामे त्यांच्या हातून झाली आहेत.



# Thanks साहेब

सुराज्य सोलापूर
रविवार, दि. ०४ सप्टेंबर २०२२



## या कन्यादानाला तोड नाही....

भारतीय संस्कृतीत कन्यादान हे सर्वश्रेष्ठ दान म्हटले आहे आणि कोणत्याही पित्याला कन्यादान करणे हे गौरवाचे वाटत असते. भारतीय राजकारणात पितामह असणाऱ्या सुशीलकुमार शिंदे यांनी आपल्या लाडक्या कन्येला सोलापूरच्या सेवेसाठी जणू दानच केले आहे. देशभरात भाजपची लाट उदयास येत असताना आणि काँग्रेसचे प्रस्थ हळूहळू कमी होताना, याची सर्व कल्पना असताना देखील आपल्या मातृभूमीसाठी आणि जनसेवेसाठी त्यांनी आपल्या कन्येला राजकारणाच्या या चक्रीवादळात आणून सोडले. जन्मताच लाल दिव्याच्या गाडीत फिरायला मिळाल्याने कोणत्याही मोठ्या पदांचे कौतुक न वाटणाऱ्या आ. प्रणिती शिंदे यांनी देखील स्वतःचे अस्तित्व तयार केले आहे. केवळ वडिलांच्या लेबलनेच निवडणूक जिंकण्याचे धोरण न ठेवता स्वतःच्या कर्तबगारीवर यश मिळवायचे, हे त्यांनी ठरवल्यामुळेच आज शहर मध्य सारख्या उमेदवारांच्या गर्दी असणाऱ्या प्रभागातून त्यांनी विजयाची हॅट्ट्रिक साध्य केली आहे. सुशीलकुमार शिंदे यांनी समाजसेवेसाठी केलेल्या कन्यादानाला कुठेच तोड नाही, म्हणूनच मनातून

शब्द निघतात.. Thanks साहेब.

## कशासाठी?....
## तर याच्यासाठीThanks

- महाराष्ट्र पोलिसात हवालदार पदावरून कारकिर्द सुरू करून देशाच्या गृहमंत्रीपदापर्यंत मजल
- सुशीलकुमार शिंदे यांनी महाराष्ट्राचे अर्थमंत्री म्हणून सलग नऊ वेळा अर्थसंकल्प मांडला.
- सलग साडेसहा वर्षे केंद्रीय ऊर्जामंत्री पदावर राहणारे व लोकसभेच्या नेतेपदी निवड होणारे पहिले मराठी नेते आहेत.
- महाराष्ट्र विधिमंडळ आणि संसद सदस्य म्हणून शिंदे यांचा कालखंड हा चार दशकांचा ( १९७४ ते २०१४) आहे.
- महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी पावणे दोन वर्षात सामाजिक न्यायाची भूमिका बजावली.
- आपले राजकीय गुरू म्हणून सुशीलकुमार शिंदे नेहमीच शरद पवार यांचा नेहमीच उल्लेख करतात.
- काँग्रेस संस्कृतीचा एक खोल असा ठसा त्यांच्या एकूण राजकारणात आणि सार्वजनिक जीवनातील वावरात आपल्याला दिसतो.
- इंदिरा गांधींपासून ते आज सोनिया गांधी यांच्यापर्यंत त्यांचा हा ऋणानुबंध त्यांनी जपलेला आहे.
- भारताचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी शिंदे यांचा सोलापूर येथे ४ सप्टेंबर,२०१६ रोजी सत्कार केला.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाने ज्या शक्यता निर्माण केल्या त्याची एक ठळक नोंद सुशीलकुमार शिंदे यांच्या प्रवासात आपण पाहू शकतो.
- महाराष्ट्र राज्याचे बाविसावे व दलित समाजातील पहिले मुख्यमंत्री (२००३)

शब्दांकन : विजय गायकवाड

*तरुणांना कळण्यासाठी...तरुणांच्याच भाषेत !*

## दगडू ते रॉकी....

**वाइलेंस, वाइलेंस, वाइलेंस.**
**आय डोन्ट लाइक इट. आय अवॉइड.**
**बट, वाइलेंस लाइक्स मी. आय कान्ट अवॉइड.**

केजीएफ चित्रपटातील हा संवाद आज तरुणाईच्या ओठावर आणि त्यातील नायक रॉकी हृदयात आहे. भारतीय राजकारणात असाच एक सोलापूर सुपुत्र नियतीने दगडू नाव दिले तरी तो सध्याच्या जगतातील केजीएफचा जणू रॉकी ठरून भारतीय राजकारणात राज्य करत राहिला आहे. सुशीलकुमार शिंदे यांचे नाव दगडू ठेवण्यात आले मात्र त्याच नावाच्या इंग्रजी अर्थानुसार (अर्थातच रॉक) हा दगडू रॉकी म्हणून सोलापूरकरांच्या हृदयात, ओठावर राज्य करत राहिला. अनेक दिग्गज राजकारणी साम..दाम..दंड...भेद याच्या जोरावर त्यांचा मार्ग अडवण्याचा प्रयत्न करत राहिले. मात्र त्या सर्वांना पुरुन उरत सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापूरसोबत सोलापूरकरांच्या मनावर देखील राज्य केले. हे ही तिकेच खरे...त्यामुळेच आयुष्याच्या या संध्याकाळी त्यांच्या या यशस्वी कारकीर्दीला मनापासून म्हणावेसे वाटते,

Thanks साहेब.






# ५२ वर्षांपूर्वी...१ मे रोजी प्रेमाची क्रांती!

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि देशाचे माजी गृहमंत्रीसुशीलकुमार शिंदे आणि त्यांच्या पत्नी उज्वलाताई यांच्या वैवाहिक जीवनाची रविवार, दि.१ मे २०२२ रोजी ५२ वर्षांची वाटचाल पूर्ण झाली आहे. ऋतुरंग (२०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या), दिवाळी अंकात सुशीलकुमारजींनी भेट तुझी माझी, या शीर्षकाचा लेख लिहिला आहे.दिनांक



१ मे १९७० रोजी आपले लग्न झाले, हे आंतरजातीय लग्न होते आणि प्रेमाच्या धाग्याने बांधून घेतल्यावर मुंबईत हा विवाह झाला,असे त्यांनी लिहिले आहे. लेखाच्या शेवटच्या भागात त्यांनी लिहिले आहे की, आज मी मागे वळून पाहतो, तेव्हा ती माझी प्रेयसी, पत्नी, तीन मुलींची आई आहे. म्हटलं तर आज पंचाहत्तराव्या वर्षी ती माझी आईही आहे.

या लेखात खूप छान उल्लेख त्यांनी केला आहे.त्यांनी लिहिले आहे की, १ मे हा कामगार दिन, महाराष्ट्र दिन जसा आहे; तसा माझ्या वैयक्तिक आयुष्यात १ मे हा क्रांतीचा दिवस आहे. त्या काळात आंतरजातीय लग्न करण्याचे धाडस आम्ही दोघांनी केले. मागचा पुढचा कसलाही विचार केला नाही. जातीच्या पलीकडे आम्ही दोघांनी जाण्याचा विचार केला. १ मे पासून माझ्या समृद्ध जीवनाचा पाया रचला गेला. आमच्या दोघांच्या निर्णयातून समाजापुढे एक आदर्श ठेवला. खरे प्रेम असेल तर जात आडवी येत नाही. सुशीलकुमार शिंदे आणि उज्वलाताईं वैद्य यांनी जातीच्या पलीकडे जाऊन हे प्रेमाचे पाऊल टाकले.रविवार १ मे रोजी या सहजीवनाची ५२ वर्षे पूर्ण केली आहेत. सुमारे ५२ वर्षांपूर्वी हा आंतरजातीय विवाह झाला. आजही असे आंतरजातीय विवाह करणे, किती धाडसाचे असते हे इथे सांगण्याची गरज नाही. त्यामुळेच आंतरजातीय विवाहचा पुरस्कार करणाऱ्या प्रत्येक तरूणाने प्रेम कसं केलं पाहिजे, कसं टिकवलं पाहिजे, याचा आदर्श निर्माण करणाऱ्या शिंदे साहेबांना निश्चितच म्हंटले पाहिजे,थँक्स साहेब.



## पुस्तकातही न मावणारे साहेब

सुशीलकुमार : एक प्रवास (रविकिरण साने), सुशीलकुमार शिंदे - एका संघर्षाची वाटचाल (चरित्रग्रंथ) मराठी अनुवादक : संतोष शेणई, प्रकाशक : अमेय प्रकाशन. (मूळ इंग्रजी पुस्तक-हू रोट माय डेस्टिनी, लेखक: डॉ. पी.आर.सुबास चंद्रन) Sushilkumar Shinde: a child of destiny' - लेखक एन.बी. घोडके, दिलीप चावरे यांचे "Saga of - Stuggle- Sushilkumar Shinde' आणि वाराणसी येथील लेखक हरीहर लाल श्रीवास्तव यांनी कामगार बस्ती से संसद भवन तक या पुस्तकांमधून मोलाची माहिती आणि तपशील दिले आहेत. तुफानातील दिवे, दूरदर्शन सह्याद्री वाहिनीने प्रसारित केलेल्या मनोगताच्या कार्यक्रमातून जीवनपट मांडला आहे. समाजाच्या सर्व थरांना स्पर्श करणाऱ्या सुशीलकुमार शिंदे यांचे व्यक्तिमत्व या सर्व पुस्तकातून मांडूनही उरतेच.

## थक्क करणारा राजकीय प्रवास

सुशीलकुमार शिंदे १६ जानेवारी २००३ ते १ नोव्हेंबर २००४ या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. २००४ ते २००६ या कालखंडात ते आंध्र प्रदेशाच्या राज्यपालपदीही आरूढ होते. ते भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात असून मनमोहनसिंग मंत्रिमंडळात गृह खात्याचे कॅबिनेट मंत्री होते. सुशीलकुमार शिंदे यांनी महाराष्ट्राचे अर्थमंत्री म्हणून सलग नऊ वेळा अर्थसंकल्प मांडला. सलग साडेसहा वर्षे केंद्रीय ऊर्जामंत्री पदावर राहणारे व लोकसभेच्या नेतेपदी निवड होणारे ते पहिले मराठी नेते होते.




## पुरस्कार

- ५ जानेवारी १९७७ : भारतीय जयसेजने देशाच्या दहा लक्षणीय तरुणांमध्ये निवडले.
- १९७८ : मनोहर साप्ताहिकाने सर्वेक्षणात सर्वात लोकप्रिय मंत्री म्हणून दुसरा पर्याय.
- १९८१: काँग्रेस पार्टीने बसव भूषण पुरस्कार म्हणून आदर्श युवा म्हणून सन्मानित केले.
- ९ मार्च १९९६: मदर टेरेसाच्या हस्ते संसदेच्या सर्वोत्तम सदस्या म्हणून राष्ट्रीय नागरिक पुरस्कार.
- २००३: भाई बागल पुरस्कार २००३, इंडिया टुडे येथे तिसरा स्थान – वाचकांची निवड सर्वोत्तम मुख्यमंत्री.
- २००५: ज्येष्ठ पत्रकार अरुण तिकेकर यांच्या हस्ते गुरुवाऱ्या शंकरराव कानिटकर पुरस्कार.
- २३ जानेवारी २००७: फर्स्ट डी लिट. डी वाई पाटील युनिव्हर्सिटीकडून सन्मानित (विषय – साहित्य)
- ९ सप्टेंबर २००७: २ रा डी लिट. श्रीकृष्णा देवराई विद्यापीठ, आंध्रप्रदेशने पदवी दिली. (विषय – साहित्य)
- १८ फेब्रुवारी २००९: थर्ड डी लिट. राजीव गांधी टेक्निकल युनिव्हर्सिटी, भोपाळ यांनी सन्मानित केले. (विषय – विज्ञान)
- ९ मे २००९: नवशक्ती टाइम्सने नवशक्ती जीवन गौरव पुरस्कार दिला. सुशीलकुमार शिंदे आणि पत्नीला – यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचा यशवंत–वेणू पुरस्कार (३–१०–२०१७)

## लोकांत आपुलकीची भावना

सोलापूरच्या न्यायालयातील एक चतुर्थश्रेणी कर्मचारी, पोलीस उप-निरीक्षक, वकील अशा क्रमाने जीवनाचा आलेख पुढे नेताना सुशीलकुमार यांना सुरुवातीच्या काळात प्रचंड संघर्ष करावा लागला. पंधरा वर्षे महाराष्ट्र राज्यात विविध खात्यांचे मंत्री म्हणून, तसेच काँग्रेस पक्षांतर्गत विविध समित्यांचे सदस्य, सरचिटणीस आणि प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदाऱ्या पेलल्या. साहजिकच प्रशासनाचा उत्तम अनुभव आणि राज्याच्या सर्व स्तरांमध्ये वावर असल्याने त्यांच्याविषयी लोकांत आपुलकीची भावना आहे.

## व्यासंग सर्वश्रुत

सुशीलकुमार शिंदे यांचा लेखन-वाचनाचा व्यासंग सर्वश्रुत आहे. त्यांनी लिहिलेले विचारवेध आणि विचारमंथन (हिंदी) हे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. त्यांना इंग्रजी, मराठी, हिंदी, उर्दू या भाषा चांगल्या अवगत आहेत. नॅशनल स्पोर्ट्स क्लबचा पेट्रन इन चीफ (१९८७), १९९३-९४ दरम्यान संसदीय कामकाजातील योगदान व जास्तीत जास्त प्रश्न उपस्थित केल्याबद्दल नॅशनल सिटिझन, भाई माधवराव बागल विद्यापीठातर्फे देण्यात येणारा भाई माधवराव बागल पुरस्कार (२००३), दि साउथ इंडियन एज्युकेशन सोसायटी या संस्थेतर्फे देण्यात येणारा चंद्रशेखरेंद्र सरस्वती राष्ट्रीय पुरस्कार (२००३), आणि वीरशैव कक्कया समाज विकास मंडळातर्फे देण्यात येणारा विशेष जीवन गौरव पुरस्कार (नोव्हेंबर २००५) हे मानसन्मान व पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.















